# शंकर जयकिशन - भाग १



चित्रपट संगीताच्या सुवर्णयुगातील शंकर-जयकिशन या विख्यात जोडीबद्दल किती आणि काय सांगायचं हा प्रश्नच पडेल. या दोघा संगीतकारांनी चित्रपट संगीताला एका अत्युच्च शिखरावर नेऊन ठेवले आणि करोडो गानरसिकांना कायमचे खूष करून ठेवले. १९४९ मधील 'बरसात' या त्यांनी संगीत दिलेल्या पहिल्या चित्रपटापासून, त्यानंतर जवळजवळ १८ वर्षे त्यांनी एकापेक्षा एक अशा अनेक सरस स्वरमधुर मेलडीजनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. तुम्हाला आठवत असेलच की नौशाद, एस्. डी. बर्मन, ओ. पी. नय्यर, मदन मोहन आणि सी. रामचंद्र यासारख्या दिग्गज संगीतकारांच्या मांदियाळीत त्यांनी आपले स्थान पक्के केले. असे हे शंकर जयकिशन होते तरी कोण ? आणि इतकी वर्षे अविरत काम करून एवढी अत्युत्तम गीते त्यांनी कशी काय दिली ही एक अजबच गोष्ट आहे. त्यांनी आपल्या संगीताची जादू मानवी आवाक्याच्याही पुढे नेऊन तिचे नयनमनोहारी रूप सादर केले. पण कालांतराने दुर्दैवाच्या फेऱ्यांत ते रसातळाला कसे गेले हे एक नशीबच म्हणावे लागेल.

शंकर रघुवंशी हे जयकिशनपेक्षा १० वर्षांनी मोठे होते. ते पंजाबी असून त्यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९२२ रोजी झाला होता. त्यांचा जन्म मध्य प्रदेशात झाला परंतु त्यांचे बालपण आंध्र प्रदेशात गेले. ते तेलगु भाषा सुध्दा चांगली बोलत असत. त्या काळी चित्रपटात प्रवेश मिळण्यासाठी नृत्यकला अवगत असणे आवश्यकच होते. (प्रेम धवन आणि सरदार मलिक हे सुध्दा नृत्य शिकले होते.)

त्यामुळे शंकर हे कथ्थक नृत्यही शिकले होते. त्यांना तबलाही सुरेख वाजवता येत असे. या सर्वामुळे संगीत क्षेत्रातील त्यांची वाट सुकर होण्यास मदतच झाली. १९५३ मध्ये, कुंदा नामक एका स्त्रीशी त्यांचे लग्न झाले होते, परंतु त्यांना मूलबाळ नसल्याने त्यांच्या कुटुंबाची फारशी माहिती मिळू शकली नाही.

गुजरातमधील बलसाड येथे ४ नोव्हेंबर १९३२ रोजी जयकिशन पांचाळ यांचा जन्म झाला. ते अकॉर्डियन वाजविण्यात तरबेज होते. त्यांचा पल्लवी मरीवाला यांच्याबरोबर १९६३ मध्ये विवाह झाला होता. त्यांना चेतन आणि योगेश असे दोन पुत्र आणि भैरवी नावाची कन्या आहे. भैरवी हा त्यांचा आवडता राग होता आणि बहुधा त्यामुळेच त्यांनी मुलीचे नाव भैरवी असे ठेवले असावे !

शंकर आणि जयकिशन या दोघांनाही संगीताचे खास असे पारंपारिक शिक्षण मिळाले नव्हते, पण संगीत हेच दोघांचेही ध्येय होते. शंकर हे मुंबईतील एका छोट्या थिएटर ग्रुपमध्ये काम करीत असत आणि आणि त्यानंतर त्यांना सुप्रसिध्द पृथ्वी थिएटर मध्ये काम मिळाले. इथे ते स्टेजवर छोटे मोठे रोल्स करीत व प्रसंगी तबलावादनही करीत असत. पृथ्वी थिएटरसाठी एका हार्मोनियम वादकाची गरज होती म्हणून शंकर यांनी बराच शोध करून जयकिशन यांना पृथ्वी थिएटर मध्ये आणले आणि त्यानंतर काही वर्षे ते दोघे पृथ्वी थिएटरच्या छत्राखाली एकत्र काम करत राहिले.

खरे तर स्वभावत: दोघेही भिन्न प्रकृतीचे असूनही त्यांची जोडी छान जमली होती. ह्याचे कारण म्हणजे त्या दोघांमध्ये संगीत हा एक समान धागा होताच, शिवाय पोटापाण्यासाठी, आहे ती नोकरी टिकवून ठेवण्याचीही गरज होतीच. पृथ्वी थिएटर सोडल्यावर, हिंदी चित्रपटसृष्टीतील पहिलीच संगीतकार जोडी हुस्नलाल भगतराम या बंधूंच्या कंपनीत ते संगीत वादक म्हणून रुजू झाले. त्यानंतर राज कपूर यांच्या 'आग' ह्या पहिल्या चित्रपटात, थेट संगीतकार राम गांगुली यांच्या हाताखाली ते काम करू लागले. राम गांगुली हेही पृथ्वी थिएटर मध्ये प्रथम काम करीत होते. 'आग' चित्रपटाच्या प्रसिध्द झालेल्या रेकॉर्ड्सवर 'संगीत - राम गांगुली' आणि त्याखाली 'चाल - शंकर किंवा जयकिशन' (जसे असेल त्याप्रमाणे) अशी तळटीप असायची. अशा प्रकारे चाल देण्यासाठी त्यांना प्रत्येक गीताला १५०/- रुपये मिळत असत.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music

that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com